दिनांक ०६/०५/२०२२

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक राजेंद्र गोरख लामतूरे, वय ४६ वर्ष, पद — पोलीस हवालदार, ब.नं.११२१, वर्ग ३, पोलीस ठाणे औसा, जि.लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक राजेंद्र गोरख लामतूरे, पोलीस हवालदार यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरूध्द औसा पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयात मदत करण्यासाठी आलोसे यांनी दि.०३/०५/२०२२ रोजी ५,०००/— रूपयाची मागणी केली बाबतची तक्रार दिनांक ०४/०५/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक ०४/०५/२०२२ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार सुरूवातीस ५,०००/— रूपयाची मागणी करून तडजोडी अंती पहीला हप्ता ३,०००/— रूपये व दुसरा हप्ता २,०००/— रूपयेची लाच मागणी केल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

तक्रारदार यांना मागणी केलेली लाचेची रक्कम ३०००/— रूपये आज दिनांक ०६/०५/२०२२ रोजी आलोसे राजेंद्र गोरख लामतूरे, पोलीस हवालदार त्यांना देण्याकरीता तक्रारदार पोलीस ठाणे औसा, जि. लातुर येथे गेले असता आरोपी लोकसेवकाने लामतूरे यांनी सदर लाचेची रक्कम ३०००/— रूपये सायं १६.५२ वा चे सुमारास पोलीस ठाणे औसा, जि. लातुर येथे तक्रारदार यांचे कडुन पंचासमक्ष स्वत: स्विकारली.

म्हणून तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस ठाणे औसा, जि. लातुर,येथे कलम ७ ला.प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद, अतिरीक्त कार्यभार पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, सपोउपनि/ संजय पस्तापुरे, पोह/ रमाकांत चाटे, भागवत कटारे, मपोना/ शिवकांता शेळके, पोना/संतोष गिरी, पोका/ शिवशंकर कच्छवे, आशिष क्षिरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मंगेश कोंडरे, पोका/ गजानन जाधव, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९९२३४१७०७६ |
| २) | पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :— | १०६४ |
| ४) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :— | ०२४८२—२४२६७४ |
| ५) | Website | :— | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :— | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :— | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner